**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०५/२०२०**
**भाग्यश्री मोरे वगैरे वि. राजेश मोरे**
CNR No. MHRG090002982020

## निशाणी क्र. ५ वरील आदेश

अर्जदारांनी प्रस्तूतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम २३ अन्वये अंतरीम आदेशासाठी दाखल केला असून त्यांचे म्हणणे खालीलप्रमाणे आहेः

२] गैरअर्जदार याने अर्जदार क्र.१ हिला वारंवार मानसिक त्रास देऊन शिविगाळ व मारहाण केली आहे. त्याने अर्जदार क्र.२ व ३ यांच्यासमोर अनेकदा तिला मारहाण केली आहे. याबाबत तिने अनेक वेळा रोहा पोलिस ठाणे येथे तक्रारी नोंदविल्या आहेत. सध्या गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१ हिला व तिच्या दोन मुली म्हणजेच अर्जदार क्र.२ व ३ यांना राहत्या सामाईक घरात शिवीगाळ करून घराबाहेर काढत आहे. तसेच त्यांना धमकावून चार दिवसात घर खाली करण्यास सांगत आहे. एकंदरीत या सर्व प्रकारामुळे अर्जदारांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. गैरअर्जदाराने अर्जदारांस शारिरीक व मानसिक त्रास देऊ नये तसेच त्यांना घराबाहेर काढलयास त्या बेघर होण्याची शक्यता असल्याने अर्जदाराने अधिनियमाच्या कलम १८ अन्वये संरक्षणात्मक आदेशाची विनंती केली आहे.

३] अर्जदार क्र.१ हिच्या मुली कु. स्वरांगी वय १० वर्षे व कु. क्रांती वय ०४ वर्षे या अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार यांच्यासोबत रोहा येथील सामाईक घरात राहात आहेत. गैरअर्जदार याच्या भितीने त्यांच्या मानसीक व शैक्षणिक बाबतीत परीणाम होत

आहे. अर्जदाराने अधिनियमाच्या कलम २१ अन्वये दोन्ही मुलींचा कायदेशीर ताबा तिच्याकडे कायम रहावा या आदेशाची विनंती केली आहे.

४] गैरअर्जदार याला धाटाव एम.आय.डी.सी.मध्ये युनिकेम कंपनीमध्ये ऑपरेटर पदाची कायमस्वरूपी नोकरीत असून त्याला दरमहा रूपये ६०,०००/– पगार आहे. तो पगारातील सर्व पैसे जुगार व मटका यावर खर्च करीत आहे. गैरअर्जदार हा अर्जदारांचा घरखर्च व इतर खर्चासाठी पैसे देत नाही. सदरचा मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने दरम्यानच्या कालावधीत दरमहा ३०,०००/– रुपये इतक्या अंतरीम आर्थिक साह्याची विनंती केली आहे.

५] अर्जाकामी गैरअर्जदाराने हजर होऊन त्याचे म्हणणे नि.क्र.१२ वर दाखल केले. त्यात त्याने आपसातील नातेसंबंध मान्य करून अर्जदारांची इतर कथने नाकारली आहेत. त्याच्या म्हणण्यानुसार लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही कधीही व्यवस्थित नांदली नाही. ती गैरअर्जदाराच्या कुटूंबियांशी वाद घालीत असे. अर्जदार क्र.१ ही स्वतः विधीज्ञा असल्याने वारंवार गैरअर्जदार याचेविरूद्ध अनावश्यक व बेकायदेशीर पोलिस व अन्य प्रशासकीय एजन्सीकडे अर्ज करून कारवाई करीत आहे व गैरअर्जदाराकडून जबरदस्तीने खोटे हमीपत्र लिहून घेतलेले आहे. तो अर्जदारांचे उत्तम संगोपन, शिक्षण भरणपोषण व औषधपाणी करीत आहे. अर्जदार ही वकील असलेने तिने जाणीवपूर्वक त्रास देणेसाठी १० वर्षांनंतर खोटी व रचनात्मक विधाने करून हा खोटा खोडसाळ अर्ज दिला आहे. गैरअर्जदारास दरमहा मिळणाऱ्या वेतनातून त्याच्या वृद्ध आईवडीलांना गावी

तसेच अर्जदारांस उपजीविकेचे दरमहा पैसे द्यावे लागतात. तसेच गृह व कुटूंबाकरीता त्याने काढलेले अन्य कर्जाचे भुकतान करता केवळ रुपये तीन हजार त्याच्या हातात उरतात. याउलट अर्जदार क्र.१ ही स्वतः व्यावसायिक वकील असून वार्षिक साधारण सहा लाख रूपये कमाविते. गैरअर्जदार हा अर्जदारास नांदविणेस तयार होता व आजही आहे. अर्जदाराने स्वतःहून कोणतेही सबळ कारण नसताना गैरअर्जदाराविरूद्ध प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे. या कारणास्तव त्याने प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६] उभय पक्षकारांच्या वि. विधीज्ञांचा यूक्तीवाद ऐकला. खालील मूद्दे माझ्या विचारार्थ निघत असून मी त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| **क्र.** | **मूद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ हिने ती कौटूंबिक हिंसाचार पीडीत असल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे काय? | होकारार्थी |
| २. | अर्जदार हे विनंती केल्याप्रमाणे संरक्षणात्मक आदेश मिळविण्यास पात्र आहेत काय? | होकारार्थी |
| ३. | अर्जदार क्र.१ ही विनंती केल्याप्रमाणे मुलगी कु. स्वरांगी व कु. क्रांती यांचा अंतरीम ताबा स्वतःकडे कायम ठेवण्यास पात्र आहे काय? | होकारार्थी |
| ४. | अर्जदार हे विनंती केल्याप्रमाणे अंतरीम आर्थिक साहय मिळविण्यास पात्र आहेत काय? | अंशतः होकारार्थी |
| ५ | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मूद्दे क्र. १ व २ करीता–

७] अर्जदारांचे मुख्य म्हणणे असे आहे की, गैरअर्जदार याला जुगार, मटका व प्लेविन याचा नाद आहे. तो सर्व पैसे हौसेमौजेवर खर्च करतो. तो घरात पैसे देत नसल्याने त्यांच्यात वादविवाद होत असत. सन २०११ मध्ये अर्जदाराची मुलगी लहान असल्याने तिने होळीच्या सणाला गावी जाण्यास नकार दिला असता गैरअर्जदाराने दरवाजाला लावलेली पट्टी काढून अर्जदाराच्या तोंडावर मारली अर्जदार मागे सरकल्याने ती पट्टी तोंडाला न लागता तिच्या कानाला लागली. त्यामुळे तिच्या कानाला सूज आली. तो तिला नेहमी आश्लिल भाषेत शिविगाळ करून अपमानीत करीत असे. त्याने बायकोची डिलेव्हरी आहे, मुलगी आजारी आहे, मुलीचे अॅडमिशन आहे अशी खोटी कारणे सांगून कंपनीतील माणसांकडून सुमारे अडीच लाख रूपये उधार घेतले होते. ते लोक अर्जदाराच्या सासरी पैसे मागायला यायचे. त्यामुळे तिच्या सासऱ्यांनी ते सर्व पैसे दिले. त्यावेळी गैरअर्जदाराने सांगितले की, तो सगळे पैसे जुगारात हारला.

८] अर्जदारास वेगवेगळ्या पतसंस्थांकडून पैसे वसूलीसाठी फोन येत होते. याबाबत अर्जदाराने गैरअर्जदारास विचारले असता ते पैसे तो जुगारात हारल्याचे सांगत होता. तो अर्जदार क्र.१ हिला मारहाण करतो. तिने त्याच्या विरोधात रोहा पोलीस ठाणे यथे तक्रार नोंदविली होती. तसेच महिला समुपदेशन केंद्र येथेही तक्रार दाखल केलेली होती. त्यावेळी गैरअर्जदाराने अर्जदारास दोन्ही मुलींसह घरातून निघून जाण्यास

सांगितले. त्यानंतर त्याने दि.११.७.२०१९ रोजी हमीपत्र लिहून दिले. परंतू काही दिवसांनी तो पुन्हा पहिल्यासारखा वागू लागला. त्याचे घरात लक्ष नाही. तो दैनंदिन खर्चासाठी अर्जदारांना पैसा देत नाही. अर्जदाराची ही कथने गैरअर्जदाराने नाकारली आहेत. त्याने म्हटले आहे की, अर्जदार क्र.१ ही विधीज्ञा असल्याने ती त्याच्याविरूद्ध वारंवार अर्ज देते. त्याने तिचे कोणतेही दागिने गहाण ठेवलेले नाहीत. तो सर्व अर्जदारांचे चांगल्या पद्धतीने संगोपन करीत आहे.

९] उभपक्षांची कथने विचारात घेता अर्जदार क्र.१ हिचे स्पष्ट म्हणणे आहे की, गैरअर्जदार हा तिचा शारिरीक व मानसिक छळ करतो, तो त्याचे पैसे जुगारात खर्च करतो. तिला होणाऱ्या छळाबाबतचे सविस्तर कथन तिने मूळ अर्जामध्ये केले आहे. यासंदर्भात नि.क्र.२ वरील कौटूंबिक घटना अहवाल पाहता त्यातून अर्जदारांच्या कथनांना दुजोरा मिळतो. दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता अर्जदार क्र.१ हिने दि.३१.८.२०२० रोजी रोहा पोलीस ठाणे येथे दिलेल्या फिर्यादीवरून गैरअर्जदाराविरूद्ध अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाली होती. तिने संरक्षण अधिकारी यांच्याकडे दि.१०.७.२०१९ रोजी अर्ज केल्याचे दिसून येते. त्यामुळे या बाबी विचारात घेता ती कौटूंबिक हिंसाचार पिडीत असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. अन्यथा तिला पोलीस ठाणे, महिला समूपदेशन केंद्र येथे अथवा प्रस्तूत न्यायालयात अर्ज करून दाद मागण्याचे कारण नाही. म्हणून या सर्व बाबी विचारात घेता अर्जदारांच्या लाभात संरक्षणात्मक आदेश पारीत करणे आवश्यक आहे. या कारणास्तव मी मुद्दे क्र.१ आणि २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.३ करीता –**

१०] प्रस्तूत अर्जाद्वारे अर्जदार हिने दोन्ही मुली (अर्जदार क्र.२ व ३) यांचा ताबा अर्जदाराकडेच राहावा अशी विनंती केली आहे. कु. स्वरांगी हिचे वय १० वर्षे व कु. क्रांती हिचे वय ०४ वर्षे असल्याचे दिसून येते. मुलींच्या अंतरीम ताब्याची विनंती विचारात घेण्यापूर्वी त्यांचे हीत बघणे आवश्यक असते. प्रस्तूत अर्जात दोन्ही मुलींचे वय पाहता त्यांचा ताबा अर्जदार हिच्याकडेच असणे आवश्यक आहे. उभयपक्षांची एकूण कथने पाहता गैरअर्जदाराने कु.स्वरांगी व कु.क्रांती यांचा ताबा अर्जदार हिच्याकडून बळजबरीने घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या बाबी विचारात घेता अर्जदारांची ही विनंती मान्य करणे योग्य ठरेल. या कारणास्तव मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.४ करीता –**

११] प्रस्तूत अर्जाद्वारे अर्जदारांनी गैरअर्जदाराकडून दरमहा ३०,०००/- रुपये इतक्या अंतरीम आर्थिक साह्याची विनंती केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, गैरअर्जदार हा युनिकेम कंपनीत नोकरीस असून त्याला दरमहा रूपये ६०,०००/- इतका पगार आहे. त्याच्या पगाराबाबत कागदपत्रे दाखल करण्याकामी अर्जदार हिने गैरअर्जदाराच्या कपंनीसोबत पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते. परंतू त्याबद्दलची माहिती तिला मिळाली नाही. गैरअर्जदार हा युनिकेम कंपनीत नोकरीस आहे ही बाब त्याने नाकारलेली नाही. परंतू त्याने म्हटले आहे की, त्याला आई वडीलांच्या तसेच दोन मुली

व स्वतःच्या उपजिवीकेकरीता पैसे द्यावे लागतात. त्याने काढलेल्या अन्य कर्जांची परतफेड करता करता दरमहा त्याच्या हाती केवळ तीन हजार रूपये उरतात. याउलट अर्जदार क्र.१ ही वकीली व्यवसाय करते व त्यापासून तिला वर्षाकाठी सहा लाख रूपये उत्पन्न मिळते.

१२]	अर्जदार क्र.१ ही वकीली व्यवसाय करते ही बाब तिनेही नाकारलेली नाही. परंतू तिचे म्हणणे असे आहे की, तिला नवीन केसेस किंवा काम मिळत नाही. तिला वकीली क्षेत्रातून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. अर्जदार ही वकीली व्यवसाय जरीही करीत असली तरीही सर्व अर्जदारांचे पालनपोषण करण्याची सर्वस्वी जबाबदारी गैरअर्जदारावर आहे. तो ती नाकारू शकत नाही. अर्जदारांचे स्पष्ट म्हणणे आहे की, तो त्याच्या पगारातील सर्व पैसे जुगार व हौसेमौजेवर खर्च करतो. त्याच्या उत्पन्नाबाबत आजरोजी अभिलेखावर कागदोपत्री पुरावा जरी नसला तरी त्याला साठ हजार रूपये पगार आहे हा मजकूर त्याने मान्य केलेला आहे.

१३]	त्यामुळे अधिनियमातील तरतुदींचा उद्देश व गैरअर्जदार याचे उत्पन्नाचे स्त्रोत या सर्व बाबींचा सारासार विचार करता अर्जदारांच्या हक्कात प्रस्तूत प्रकरण दाखल तारखेपासून ते त्याच्या अंतिम निकालापर्यंत एकत्रितरित्या दरमहा रूपये १४,०००/- इतके अंतरीम आर्थिक साह्य मंजूर करणे न्यायोचित ठरेल. या कारणास्तव मी मूद्दा क्र. ४ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत मूद्दा क्र. ५ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (नि. क्र. ५) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराने सर्व अर्जदारांविरूद्ध कुठलाही कौटूंबिक हिंसाचार करू नये अथवा त्यांना सामाईक घरातून बाहेर काढू नये असा अंतरीम आदेश पारीत करण्यात येतो.

३. मुलगी कु. स्वरांगी व कु.क्रांती यांचा अंतरीम ताबा अर्जदार हिच्याकडे राहील.

४. प्रस्तूत अर्ज (नि.क्र.१) दाखल तारखेपासून ते त्याच्या अंतिम निकालापर्यंत गैरअर्जदाराने अर्जदारांना एकत्रितरित्या दरमहा रुपये १४,०००/- (अक्षरी रुपये चौदा हजार मात्र) इतके अंतरीम आर्थिक साह्य अदा करावे, असा अंतरीम आदेश पारीत करण्यात येतो.

५. या आदेशाबाबत संरक्षण अधिकारी व संबंधीत पोलीस ठाणे यांना कळविण्यात यावे.

६. या आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना मोफत देण्यात यावी.

(आदेश खूल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by Sameer Dilip Kamalakar
Date: 2021.03.16 17:03:39 +0000

दिनांक – १६.०३.२०२१

(स. दि. कमलाकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
रोहा, जि. रायगड.